**संगीत**

संगीत आहे एक साधना
सुरांची व स्वरांची आराधना
सुगंधी इतुके की लाजवेलहि चंदना
भावात्मक इतुके की जागवेलहि संवेदना ।

संगीत आहे एक व्यसन
सुरेल, शाब्दिक वलयांचे आसन
गुंतलेल्या भाव-भावनांचे मीलन
विविध छटांचे, रसांचे संमेलन ।

संगीत आहे एक प्रवाह, एक झरा
स्वरांच्या कडीकपारीतून झिरपणारा
स्वच्छंद वळणे घेत धावणारा
तुषारांच्याहि श्रवणस्पर्शाने, वेड लावणारा ।

- **वनीता कुबल** (लास वेगस, नेव्हाडा)